महाराष्ट्र शासन

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग,जि.रायगड.**

जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,लिमये वाडी, अलिबाग.जि.रायगड –४०२ २०१

**GOVERNMENT MEDICAL COLLEGE, ALIBAG –RAIGAD**

DISTRICT CIVIL HOSPITAL AREA, ALIBAG BEACH ROAD, LIMYEWADI, ALIBAG DIST.RAIGAD – 402 201

Email- deangmcalibag@gmail.com Phone No. 02141-299214 www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/यंत्रसामुग्री /साधनसामुग्री खरेदी/दरपत्रक मागणी/२३३२ /२०२६ दिनांक. ०८ .०७.२०२६

**दरपत्रक मागणी पत्र.**

प्रति,

------------------------

------------------------

------------------------

**विषय :-** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग-रायगड या संस्थेच्या शल्यचिकित्साशास्त्र विभागा करीता आवश्यक यंत्रसामुग्री/साधनसामुग्री खरेदी करण्याबाबत...

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग-रायगड या संस्थेतील शल्यचिकित्साशास्त्र विभागाकरीता Eletrical Neuro Drill – Craniotome & Perforator System या यंत्रसामुग्रीची आवश्यकता आहे, त्याअनुषंगाने त्यासंबधीत यंत्रसामुग्री ची खरेदी ही खालील नमुन्यात मोहरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्ती नुसार सादर करावेत.

| Sr.No | Particulates | Quantity | Rate Per Unit |
|---|---|---|---|
| 1. | Eletrical Neuro Drill – Craniotome & Perforator System | 01 | Including All Taxes |

अटी व शर्ती.

१. दरपत्रक मोहरबंद लिफाफा , दि. १६ /०७/२०२६ **रोजी साय.०५:०० वाजेपर्यंत** कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राहय धरले जाणार नाही.

२. दरपत्रक मोहोरबंद लिफाफा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग. जि. रायगड ४०२२०१ (जिल्हा रुग्णालय आवार) यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर "Eletrical Neuro Drill – Craniotome & Perforator System" दरपत्रक मागणी क्रमांक, तारीख व विभागाचे नाव असे लिहुन सादर करावे.

३. लिफाफ्यावर पुरवठाधारकाचे पुर्ण नाव, भ्रमणध्वनी क्र. आणि संपूर्ण पत्ता, संकेतांक क्र. (Email address) लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

४. दर पत्रकात नमुद केलेले दर पुढील एका वर्षासाठी ग्राहय धरले जातील.

५. प्रस्तावित उदिदष्टांकरिता दरपत्रक आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत.
६. सर्वात कमीतकमी दराचे दरपत्रकाचा पुरवठा आदेशाकरिता विचार करण्यात येईल.
७. सदर उदिदष्टांची किंमत, सर्व करांसहीत (including all taxes )एकुण किंमत अशी दर्शविण्यात यावी.
८. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये. दरपत्रक हे पुर्णपणे छापील असावे. हस्तलिखित दरपत्रके ग्राहय धरले जाणार नाहीत.
९. दरपत्रक मोहोरबंद लिफाफयात सादर करावयाचे दस्ताऐवज (Documents Required)
१) अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक (दिलेल्या विनिर्दिष्टेनुसार ( Specification)
२).जी.एस.टी.क्रमांक पत्र. ३) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, ४) पॅनकार्डची प्रत.
१०. ज्या पात्र दरपत्रक धारकाचे दर हे न्यूनतम असतील व दस्ताऐवज पुर्ण असतील अशा पुरवठादारास पुरवठा आदेश मिळाल्यानंतर दरपत्रदारकास आवश्यकते नुसार सदरील विभागासाठीचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.
११. पुरवठा आदेश मिळाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत पुरवठा न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल व व्दितीय न्युनतम पात्र पुरवठाधारकाला प्रथम न्युनतम दराने पुरवठा आदेश देण्यात येतील. **पुरवठादाराने पुरवठा करण्यासाठी वाहतुक खर्च स्वत: करण्यात यावा.**
१२. अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे तसेच कोणतेही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे हे अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखून ठेवले आहेत.
१३. पुरवठा पुर्ण झाल्यानंतर तीन प्रतीत देयकेही अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग जि. रायगड यांचे नावाने देण्यात यावेत.
१७ . देयकाची अदायगी ही शासनाकडून अनुदान प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येईल. देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे विलंब शुल्क अदा केले जाणार नाही.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग-रायगड

प्रत - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या सुचना फलकावर दरपत्रक मागविणया संदर्भात दिनांक : ०८/०७/२०२६ सुचना देण्यात आल्या आहेत.